सत्र २०२१-२०२२ मध्ये विनियम क्रं.४/२०१९ नुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता कौशल्य विकास योजना सुरू करण्यात आलेली असून सदर योजना ही संलग्नित महाविद्यालयांमध्ये मा.कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार प्रथम सत्राकरिता **दिनांक २० डिसेंबर, २०२१ ते २८ फेब्रुवारी, २०२२** या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आल्यात. यामध्ये **अमरावती जिल्हा-०९ अकोला जिल्हा-०२, बुलडाणा जिल्हा-०४, यवतमाळ जिल्हा-१० व वाशिम जिल्हा-०२ असे एकुण २७** महाविद्यालये तसेच ०१ **पदव्युत्तर शैक्षणिक विभाग** यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

तसेच द्वितीय सत्र **दिनांक १० मे, २०२२ ते दिनांक २० मे, २०२२** या कालावधीत आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये **अमरावती जिल्हा-०६ अकोला जिल्हा-०४, बुलडाणा जिल्हा-०४, यवतमाळ जिल्हा-०१ व वाशिम जिल्हा - ०० असे एकुण १६** महाविद्यालयांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

***

विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे कार्यक्रम :

विद्यापीठ विद्यार्थी परिषद व विद्यापीठ शैक्षणिक विभाग विद्यार्थी परिषद यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले उपक्रम :

सत्र २०१९-२०२० करिता शासनाकडून विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठन करण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे सत्र २०२१-२०२२ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही. त्यामुळे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेद्वारे कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले नाहीत.

४) विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवड :

सत्र २०१९-२०२० करिता शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे सत्र २०२१-२२ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही.

५) इतर माहिती :

अ) संसदीय प्रशिक्षण अभ्यासक्रम :

सत्र २०२१-२०२२ मध्ये कोरोना प्रादुर्भाव व शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रकुल ससंदीय मंडळ मुंबई तर्फे आयोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्यापीठाची चमू पाठविण्यात आलेली नाही.

ब) आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजन :

विद्यापीठ आणि आंतर विद्यापीठ तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर सांस्कृतिक स्पर्धामध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या आणि विद्यापीठ शैक्षणिक विभागांच्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, त्यांच्यातील सुप्तगुणाचा विकास व्हावा यादृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ प्रयत्नशील असून सातत्याने प्रगती पथाकडे वाटचाल करीत आहे.

क) आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव आयोजन :

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना वाढीस लागावी तसेच त्यांच्यातील कलागुणांना व कलात्मक मूल्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी आवर्जून विद्यापीठ युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. या हेतूने २०२१-२०२२ या सत्रात युवा महोत्सवाचे आयोजन **श्री ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक २२ एप्रिल, २०२२ ते २५ एप्रिल, २०२२** या कालावधित यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

या युवा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. दिलीप मालखेडे यांचे अध्यक्षतेखाली, तर उद्घाटक म्हणून मा. ना. सुनीलजी केदार क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य, हे होते. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. ना. यशोमतीजी ठाकूर, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य, विशेष अतिथी म्हणून मा. ॲड. अशोकजी राठी, अध्यक्ष, श्री ब्रजलाल बियाणी शिक्षा समिती, अमरावती हे होते. संयोजक म्हणून डॉ. दिपक शेषराव धोटे, प्राचार्य, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, सांस्कृतिक चमू निवड समिती सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, एस. पी. एम. महाविद्यालय, चिखली, डॉ. सौ. जयश्री वैष्णव, महिला महाविद्यालय, अमरावती, सुरमणी प्रा.कमलताई भोंडे, अमरावती, डॉ. रेखा मग्गीरवार, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती व डॉ. राजीव बोरकर, संचालक, विद्यार्थी विकास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे विशेष उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

या युवा महोत्सवाचा समारोप समारंभ दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी मा. डॉ. दिलीप मालखेडे, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली, मा. ना. ओमप्रकाशजी उर्फ बच्चुभाऊ कडू, शालेय शिक्षण, महिला व बालविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.आ.सुलभाताई खोडके, आमदार, अमरावती यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये तर श्री. शिव ठाकरे, मराठी बिग बॉस-२ विजेता यांचे प्रमुख आकर्षण तसेच मा. ॲड. अशोकजी राठी, अध्यक्ष, श्री ब्रजलाल बियाणी शिक्षा समिती, अमरावती यांचे विशेष अतिथीमध्ये तर डॉ. तुषार देशमुख, कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. दिपक धोटे, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, सांस्कृतिक चमू निवड समिती सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, एस. पी. एम. महाविद्यालय, चिखली, डॉ. सौ. जयश्री वैष्णव, महिला महाविद्यालय, अमरावती, प्रा.कमलताई भोंडे, अमरावती, डॉ. रेखा मग्गीरवार, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती व डॉ. राजीव बोरकर, संचालक, विद्यार्थी विकास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे विशेष उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

हा युवा महोत्सव अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक संहितेप्रमाणे घेण्यात आला. या महोत्सवात **दिनांक २२ एप्रिल, २०२२ ते २५ एप्रिल, २०२२** पर्यंत एकांकिका, स्किट, माईम, लोकनृत्य, सुगम संगीत, शास्त्रीय गायन, समूहगान, पाश्चात्य गायन, शास्त्रीय नृत्य, स्वर वाद्य, तालवाद्य, स्पॉट पेंटींग, पोस्टर मेकींग, कोलाज, कार्टूनिंग, क्ले मॉडेलिंग, रांगोळी, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आणि क्विझ, फोक ऑर्केस्ट्रॉ इत्यादी नावीण्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर पाचही जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी

झाले होते. संपूर्ण अमरावती शहर व संपूर्ण अमरावती विभागातील परिसर या महोत्सव कालावधीत विद्यार्थ्यांच्या कलागुण सादरीकरणाने भारावून गेला होता.

या युवा महोत्सवामध्ये प्रत्येक स्पर्धा प्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीसे देण्यात आली. सदर पुरस्कार हे आयोजित करण्यात आलेल्या एकूण विविध २७ कला प्रकारांमध्ये प्रदान करण्यात आले. या महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांनी सर्वाधिक गुण संपादन केलेत अशा महाविद्यालयांना सर्वसाधारण विजेता म्हणून पुरस्कार सुध्दा प्रदान करण्यात आलेले आहेत. यावर्षी सर्वसाधारण विजेता पुरस्काराकरिता ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांचेकडे सदर फिरते चषक प्रदान करण्यात आले.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाचे सांस्कृतिक समितीचे सन्माननीय सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य, सर्व शिक्षण विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारीवृंद यांचे या महोत्सवाच्या संचलनात बहुमोल सहकार्य लाभले.

****

६) गौरवान्वित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत, खाली नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तसेच योगदानाबद्दल दि. १ मे, रोजी उत्कृष्ट सेवा गौरव प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत असतात त्यानुसार दि. १ मे २०२२ ला उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

अ) विद्यापीठ स्तर -

(अ) शिक्षक :
डॉ. सौ. अनीता सुरेंद्र पाटील
प्राध्यापक, जीवतंत्रशास्त्र विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

(ब) प्रथम श्रेणी अधिकारी :
श्री राजेश शिवस्वामी एडले
विद्यापीठ उपअभियंता, अभियांत्रिकी विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

(क) द्वितीय श्रेणी अधिकारी :
श्री. अनिल धोंडू काळे
अधीक्षक, वित्त विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

(ड) तृतीय श्रेणी कर्मचारी : **श्री. पुरुषोत्तम नागोराव सदावर्ते**
वरिष्ठ सहायक, परीक्षा विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

(इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी : **श्री. रामभाऊ महादेवराव बुगल**
शिपाई, भुगर्भशास्त्र विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर -

(अ) प्राचार्य / संचालक : **डॉ. निलेश नारायणराव गावंडे**
स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान आणि आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा, जि.बुलढाणा

(ब) शिक्षक : **डॉ. अरुण धोंडुसिंह चव्हाण**
विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.

(क) शिक्षकेत्तर कर्मचारी : **श्री. श्यामकुमार सा. गोरडे**
ग्रंथालय परिचर,
श्रीमती नानकीबाई वाधवाणी, कला महाविद्यालय, यवतमाळ

नावीन्यपूर्ण उपक्रम : **स्वातंत्र्य सैनिक श्री कन्हैयालालजी रामचंद्र इन्नानी महाविद्यालय, ,**
कारंजा (लाड), जिल्हा वाशिम.

*****

७) वार्षिकांक स्पर्धा

आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०२१-२०२२ मध्ये सहभागी झालेल्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयांपैकी खालील महाविद्यालयांचे वार्षिकांक पारितोषिकास पात्र ठरले :

बिगर व्यावसायिक महाविद्यालये (शहरी विभाग)

प्रथम	**'भारती'** भारतीय महाविद्यालय, अमरावती.
द्वितीय	**'प्रतिभा'** विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.
तृतीय	**'कल्पना'** फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद.

व्यावसायिक महाविद्यालये (शहरी विभाग)

प्रथम	**"Innovator" 2022** सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती.
द्वितीय	**"Techno - Stream" 2022** प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा.
तृतीय	**"Techno - Rhythm" 2022** डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावती.

बिगर व्यावसायिक महाविद्यालये (ग्रामीण विभाग)

प्रथम	**'कदंबिनी'** इंदिरा महाविद्यालय, कळंब.

द्वितीय	**'फुलोर'** गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार
तृतीय	**'आरोह'** कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा.

व्यावसायिक महाविद्यालये (ग्रामीण विभाग)

प्रथम	**"Potential" 2022** पी. आर. पोटे पाटील, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती.

*****

८) राष्ट्रीय छात्रसेना

जिल्हा	छात्रसेना विद्यार्थी		छात्रसेना अधिकारी		वार्षिक शिबिरात सहभागी				गणतंत्र दिवस संचलन शिबिर नवी दिल्ली सहभाग			बी प्रमाणपत्र उत्तीर्ण		सी प्रमाणपत्र उत्तीर्ण		युथ एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत सहभाग		थल सैनिक शिबिर, नवी दिल्ली सहभागी	
	मुले	मुली	पुरुष	स्त्री	मुले	मुली	अधिारी		मुले	मुली	अधिकारी	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली
							पुरुष	स्त्री											
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०
अमरावती	७५४	८६१	१६	७	३२९	४३५	११	१	२	४	१	१४०	१७२	११५	९४	१०	५	२	
अकोला	२८२	२६२	५	२	९६९	९२७	५	२	-	-	-	८६	५९	५५	३५	१३	७	३	-
बुलढाणा	७२१	२५५	१२	-	३६०	९०४	९	-	-	-	-	१४६	३१	१०३	४५	-	-	-	-
यवतमाळ	४५३	२२३	७	१	२२६	९४४	६	-	-	-	-	८२	२९	६९	२३	-	-	-	-
वाशिम	५९	६	१	-	३३	६	९	-	-	-	-	८	३	२	-	-	-	-	-

९) जनसंपर्क - विविध कार्यक्रम

- निरंक -

(अहवाल कालावधीत कोव्हीड - १९ च्या प्रभावामुळे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले नाही.)

****

१०) श्री. संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र

- दि. १५ ऑगस्ट, २०२१ रोजी कोंडेश्वर रोड बडनेरा येथील विटाभट्टी कामगारांच्या मुला मुलींना अध्यासन केन्द्रातर्फे पुस्तक व शालेय साहित्य वाटप कार्यक्रम मार्गदर्शन.
- दि. ९ सप्टेंबर, २०२१ रोजी राष्ट्राच्या जडणघडणीत 'युवकांची भूमिका' या विषयावर चर्चासत्र संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र व समाजकार्य महाविद्यालय अमरावती द्वारा सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यक्रम.
- दि. १८ डिसेंबर, २०२१ रोजी संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी निमित्त समाधी मंदिर गाडगे नगर, अमरावती येथे अन्नदान व वस्त्रदान. मा. बापूसाहेब देशमुख, आणि अध्यासन प्रमुख डॉ. डी. एच. काळे यांचे प्रबोधन कार्यक्रम.
- दि. २० डिसेंबर २०२१, संत गाडगे बाबा यांचे मामाचे गाव दापुरा शिरजदा, ता. मूर्तिजापूर, जि.अकोला ६५ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमास भेट व मार्गदर्शन अध्यासन प्रमुखांनी केले.
- दि. २० डिसेंबर, २०२१ रोजी संत गाडगे बाबा पुण्यतिथी निमित्त मा. प्रफुल्ल गवई व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी फोटोला हारार्पण तसेच गाडगे बाबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण कार्यक्रम घेण्यात आला.
- दि. २० डिसेंबर, २०२१ रोजी संत गाडगे बाबा पुण्यतिथी निमित्त समाधी मंदिर अमरावती येथे वस्त्रदान व अन्नदान मा.खा. श्रीमती नवनीत राणा, मा. बापूसाहेब देशमुख, डॉ. डी. एच. काळे अध्यासन प्रमुख यांचे मार्गदर्शन कार्यक्रम.
- दि. २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी गाडगे बाबा जयंती निमित्त अध्यासन केन्द्रात कार्यक्रम तसेच फोटोला हारार्पण कार्यक्रम घेण्यात आला.
- दि. ०१ मे, २०२२ रोजी कामगार दिनानिमित्त विद्यापीठातील कंत्राटी पद्धतीवर काम करणारे कामगार स्त्री, पुरुष यांना अध्यासन केंद्रातर्फे वस्त्र वाटप कार्यक्रम मा. कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आला.
- दि. ०५ जून, २०२२ रोजी नागरवाडी येथे संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख यांचे मार्गदर्शन तसेच मा. राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू यांनी गाडगेबाबांच्या फोटो प्रदर्शनीस भेट दिली व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.
- दि. २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी अकोला जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ५२ जलसेवकांची संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रातील फोटो गॅलरीला भेट व मार्गदर्शन.
- दि. २९ मार्च, २०२२ रोजी अमरावती विभाग, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, अकोला जिल्ह्यातील ८६ जलसेवकांची संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रातील गाडगेबाबांच्या फोटो गॅलरीला भेट व मार्गदर्शन

- नाम फाऊंडेशन व संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी आत्महत्याग्रस्त २८ कुटुंबियांना मदतीचा हात आणि प्रत्येकी रुपये २५ हजार चा धनादेश वाटप मा. कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आला.
- दि. ९ मे, २०२२ रोजी मुलांचे बाळगृह ख्रिश्चन मिशनरी अमरावती च्या ४७ मुलींची संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राच्या फोटो गॅलरीला भेट व मार्गदर्शन.
- दि. १ मे, २०२२ रोजी सदाशांती बाळगृह अमरावती येथील विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रातील फोटो गॅलरीला भेट व मार्गदर्शन.
- दि. २६ मार्च, २०२२ रोजी अमरावती विभाग, अमरावती अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, अकोला जिल्ह्यातील ९६ तलाठी पंजाबराव देशमुख प्रबोधिनी अमरावती येथील प्रशिक्षणार्थी यांची संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रातील फोटो गॅलरीला भेट व मार्गदर्शन.

*****

११) आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे २०२१-२२ या वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम / कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	आयोजित महाविद्यालयाचे नाव	कार्यक्रम / कार्यशाळेचा विषय
१	२	३
१.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक २६, २७ जुलै २०२१ दोन **दिवसीय ऑनलाईन वेबिनार** चे आयोजन 'समकालीन आरोग्य विषयक समस्या आणि कोव्हिड-१९' या विषयावर एम. ए. समुपदेशन व मानसोपचार पद्धती आणि एम. ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार अभ्यासक्रमाद्वारे आयोजित करण्यात आले होते.
२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	५ सप्टेंबर २०२१ रोजी **शिक्षक दिनाचे** आयोजन 'समुपदेशन प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका व जबाबदारी' या विषयावर करण्यात आले होते.
३.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	३१ ऑक्टोबर २०२१ **'राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रम'** एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमाद्वारे साजरा करण्यात आला होता.
४.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	२६ नोव्हेंबर २०२१ रोजी **संविधान दिन** हा 'सामाजीक विकासात संविधानाचे योगदान' या विषयावर एम.ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार अभ्यासक्रमाद्वारे अतिथी व्याख्यानाद्वारे आयोजित करण्यात आला.
५.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	**जागतिक मानवाधिकार** दिन १० डिसेंबर २०२० रोजी एम. ए. आजीवन अध्ययन विस्तार तसेच एम. ए. समुपदेशन व मानसोपचार पद्धती अभ्यासक्रमाद्वारे 'मानव अधिकाराचे महत्व आणि उपयोगिता' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

१	२	३
६.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता **'विद्यार्थी प्रेरणा कार्यक्रम'** २० डिसेंबर २०२१ रोजी आजीवन अध्ययन विस्तार विभागा द्वारे आयोजित करण्यात आला होता.
७.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	कोरोना कालावधीमध्ये संक्रमित रूग्णांचे समुपदेशन केल्याबद्दल **'समुपदेशकांचा सत्कार - जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती'** हा कार्यक्रम ३० डिसेंबर २०२१ रोजी आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता.
८.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक १ ते ७ जानेवारी २०२१ या कालावधीमध्ये एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमाद्वारे **'७५ करोड सूर्यनमस्कार संकल्प आठवडा'** साजरा करण्यात आला होता.
९.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	३ जानेवारी २०२२ रोजी **'सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम'** निमित्त पुनर्रचित समाजात सावित्रींच्या लेकींचे योगदान या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
१०.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	८ जानेवारी २०२२ रोजी एम. ए. समुपदेशन व मानसोपचार पद्धती या अभ्यासक्रमाचा **'विद्यार्थी प्रेरणा कार्यक्रम'** आयोजित करण्यात आला होता.
११.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	१२ जानेवारी २०२२ रोजी **'राजमाता जिजाऊ जयंती'** पर्वावर 'राजमाता जिजाऊ यांची स्वराज्य निर्मिती मधील भूमिका आणि विसाव्या शतकातील मातृशक्ती म्हणून जिजाऊचे महत्त्व' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
१२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	३१ जानेवारी २०२२ रोजी **'बॅच फ्लावर रेमेडिज'** या विषयावर ऑनलाइन इंटरनॅशनल सेमिनारचे आयोजन पी.जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स या पदविका अभ्यासक्रमाद्वारे आयोजित करण्यात आले होते.
१३.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	१४ फेब्रुवारी २०२२ रोजी **'गडकिल्ल्यांचे अनभिज्ञ पैलू'** या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
१४.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	१२ फेब्रुवारी २०२२ रोजी सेवाग्राम येथे **'अभ्यास दौरा'** पी. जी. डिप्लोमा नॅचरोपॅथी आणि योगिक सायन्स द्वारा आयोजित करण्यात आला होता.
१५.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	१८ फेब्रुवारी २०२२ रोजी **'N.E.P.- 2020 आणि प्रौढ शिक्षण आजीवन अध्ययन आणि विस्तार'** या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन आयोजित करण्यात आले होते.

१	२	३
१६.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम निमित्त १९ फेब्रुवारी २०२२ रोजी '**स्वराज्य निर्मितीत छात्रपती शिवरायांचे योगदान'** या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
१७.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	दिनांक २ ते ३ मार्च व ४ ते ५ मार्च २०२२ रोजी **'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा'** आयोजन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे करण्यात आली.
१८.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	३१ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२२ रोजी **'Immobility Enhancement Through Soft Skill'** दोन दिवसीय ऑनलाईन वर्कशॉपचे आयोजन एम.ए. समुपदेशन आणि मानसोपचार पद्धती या अभ्यासक्रमाद्वारे करण्यात आले होते.
१९.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त '**इमोश्नल फ्रिडम टेकनिक्स**' एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.
२०.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	वझ्झर येथे **'अभ्यास दौरा**' ९ मार्च, २०२२ रोजी एम.ए. समुपदेशन आणि मानसोपचार अभ्यासक्रमाद्वारे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.
२१.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाद्वारा चिखलदरा येथे १२ मार्च ते १४ मार्च '**योग शिबिरांचे'** आयोजन करण्यात आले होते.
२२.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	२० मार्च, २०२२ रोजी काटकुंभ येथे **'अभ्यास दौरा**' एम.ए. समुपदेशन आणि मानसोपचार अभ्यासक्रमाद्वारे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.
२३.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	जागतिक आरोग्य दिन निमित्त '**सायकल रॅलीचे**' आयोजन दिनांक ७ एप्रिल २०२२ रोजी करण्यात आले. या सायकल रॅलीचे उद्घाटक मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे होते. याचे आयोजन पी. जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी अँड योगिक सायन्स अभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते.
२४.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	अतिथी व्याख्यानाचे आयोजन दिनांक १२ एप्रिल २०२२ रोजी **'पंचकर्म'** या विषयावर करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. वैद्य मीरा औरंगाबादकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते.
२५.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	**'निःशुल्क योग शिबिराचे**' आयोजन १ ते २१ जून २०२२ रोजी विद्यार्थी भवन येथे करण्यात आले होते. याचे आयोजन एम.ए. योगशास्त्र आणि पी. जी. डिप्लोमा इन योगा थेरपी अभ्यासक्रमाद्वारे करण्यात आले होते.

१	२	३
२६.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	अतिथी व्याख्यान विषय '**स्नेहन स्वेदन चिकित्सा**' पद्धती दिनांक ३ जून २०२२ रोजी करण्यात आले होते. वक्ते श्रीमती मिरा औरंगाबादकर होत्या. याचे आयोजन एम.ए. योगशास्त्र आणि पी.जी. डिप्लोमा योगा थेरपी अभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते.
२७.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	**'जागतिक पर्यावरण दिन**' दिनाक ५ जून २०५५ रोजी मा. कुलगुरू, डॉ. दिलीप मालखेडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन एम.ए. योगशास्त्र आणि पीजी डिप्लोमा योगा थेरेपीअभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते.
२८.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	**'शिवराज्याभिषेक दिन सोहळा'** दिनांक ०६ जून २०१९ रोजी संपन्न झाला. अध्यक्ष मा. कुलगुरू, डॉ. दिलीप मालखेडे आणि प्रमुख वक्ते डॉ. वैभव मस्के होते. या कार्यक्रमाचे आयोजन आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग द्वारा करण्यात आले होते.
२९.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	८ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस दिनांक १९ आणि २० जून २०२२ रोजी करण्यात आला होता. या योगदिनाचा विषय **'ड्यूरिंग कोविड-१९ पेंडेमिक योगी षटकर्म सिस्टीम'** याचे उद्घाटन डॉ. एच. आर. नागेंद्र यांच्या हस्ते करण्यात आले होते. तर आयोजन एम.ए. योगशास्त्र आणि पी.जी. डिप्लोमा योगा थेरेपी अभ्यासक्रम द्वारे करण्यात आले होते.
३०.	आजीवन अध्ययन व विस्तार विभाग	सामाजिक न्याय दिवस दिनाक २६ जून, २०२२ रोजी साजरा करण्यात आला याचा विषय **'राजर्षी शाहू महाराज व्यक्ती आणि कार्य'** होते. या प्रसंगी प्रमुख वक्ते श्री. राहुल आठवले, पोलीस निरीक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन एम. ए. आजीवन अध्ययन आणि विस्तार या अभ्यासक्रमा द्वारे करण्यात आले होते.

*****

१२) विद्यापीठ आरोग्य केंद्र

१) विद्यापीठ आरोग्य केंद्राकरिता शासनाकडून आरोग्य अधिकारी -१, आरोग्य परिचर - १ या प्रमाणे पदे मंजूर असून त्या पदावर सद्यस्थितीत खालील अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

१. डॉ.स्मिता मधुकर थोरात, आरोग्य अधिकारी
२. श्री. सचिन उमाकांत बाळापुरे, आरोग्य परिचर

२) विद्यापीठ आरोग्य केंद्रात अहवालाच्या कालावधीत १,७१६ शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी सुविधेचा लाभ घेतलेला आहे.

३) अहवाल वर्षात आरोग्य केंद्रातर्फे

(१) कोविड - १९ जनजागृती अभियान राबिवण्यात आले, त्यामध्ये कोविड - १९ विषयक माहितीफलक लावणे तसेच विविध विभागांमध्ये मास्क, सॅनिटायझर पुरविणे व सोडीयम हायपोक्लोराईड फवारणी करून घेणे.

(२) विद्यापीठ कार्यरत शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांचे लसीकरण करून घेणे.

(३) समता सप्ताह तसेच विद्यापीठ परिसरात कार्यक्रमांमध्ये आरोग्य केंद्राद्वारे प्रथमोपचार व आवश्यकता पडल्यास ॲम्बुलन्सची सुविधा पुरविण्यात आली.

(४) विद्यापीठात कार्यरत महिला अधिकारी, कर्मचारी, शिक्षिका ह्यांच्याकरिता मार्गदर्शन व मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिराचे आयोजन दि. ३० जुलै, २०२२ रोजी आरोग्य केंद्राद्वारे करण्यात आले. १९ महिलांची गर्भपिशवीच्या कर्करोगाची चाचणी करण्यात आली तर एकूण १२५ महिलांनी शिबिराचा लाभ घेतला.

******

१३) विद्यापीठ वसतिगृह (मुलींचे व मुलांचे)

अ.क्र.	विवरण	एकूण विद्यार्थी	
		मुले	मुली
१.	वसतिगृह क्र. १	२४	६२
२.	वसतिगृह क्र. २ (मागासवर्गीय)	८५	७७
३.	वसतिगृह क्र. ३	६२	५०
	एकूण	**१७१**	**१८९**

******

१४) नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य

- **राष्ट्रीय नवोपक्रम दिवस-२०२१ (विद्यापीठ स्तरावर ऩवोपक्रम आणि स्टार्टअप वर घोषवाक्य स्पर्धा आणि लोगो स्पर्धा) :**

राष्ट्रीय नवोपक्रम दिवस-२०२१ निमित्त विद्यापीठ स्तरावर ऩवोपक्रम आणि स्टार्टअप वर घोषवाक्य स्पर्धाचे आणि लोगो स्पर्धाचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दिनांक ११ ते १५.१०.२०२१ रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमाकरिता डॉ. अभय जेरे, मुख्य नवोपक्रम अधिकारी, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, मुंबई यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

दिनांक ११ ते १५ ऑक्टोबर, २०२१ या कालावधी दरम्यान शैक्षणिक विभागातील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळामार्फत करण्यात आले. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ रोजी **राष्ट्रीय नवोपक्रम दिवस-२०२१ निमित्त विद्यापीठ स्तरावर नवोपक्रम आणि स्टार्टअप वर घोषवाक्य आणि लोगो स्पर्धांचे** आयोजनामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सहभाग पंचाद्वारे तपासून विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **यशस्वी उद्योजक/स्टार्टअप संस्थापक यांचे माझे कथा-प्रेरणा सत्राचे आयोजन :**

यशस्वी उद्योजक/स्टार्टअप संस्थापक यांचे माझे कथा-प्रेरणा सत्राचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक २०.१०.२०२१ रोजी करण्यात आले.
सदर कार्यक्रमाकरिता श्री. सुमन सेन गुप्ता, संचालक नार्थन लाईट्स ॲनालीटीक्स यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **उद्योजकता कौशल्य-२०२२ वर कार्यशाळेचे आयोजन :**

उद्योजकता कौशल्य-२०२२ वर कार्यशाळेचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक १५.०१.२०२२ रोजी करण्यात आले.
सदर कार्यशाळेकरिता श्री. उदय पुरी, महाव्यवस्थापक, जिल्हा औद्योगिक केंद्र, अमरावती आणि श्री. प्रदीप इंगोले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), अमरावती यांना या कार्यशाळेचे प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **राष्ट्रीय स्टार्टअप दिवस साजराकरणे :**

राष्ट्रीय स्टार्टअप दिवस संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक २०.०१.२०२२ रोजी साजरा करण्यात आला.
सदर राष्ट्रीय स्टार्टअप दिवस साजरा करण्याकरिता श्री. किरण पातुरकर, अध्यक्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अद्योगिक संघटना, अमरावती आणि डॉ. स्वप्निल कोकाटे, व्यवस्थापकीय संचालक, ASPECT Integrated I.T. Pvt. Ltd. यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **Design Thinking & Critical Thinking या विषयावर कार्यशाळा :**

Design Thinking & Critical Thinking या विषयावर कार्यशाळेचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दिनांक २९.०१.२०२२ रोजी करण्यात आले.

सदर कार्यशाळेच्या आयोजनाकरीता श्री. अनिरुध्द शेलोटकर, Founder Director, My Advocacy Consultancy and Services यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **IPR जागरुकता कार्यक्रम :**

IPR जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक १४.०२.२०२२ रोजी करण्यात आले.
सदर IPR जागरुक्ता कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता श्री. अजय सदाशिव ठाकूर, Assistant Controller of Patents & Design, Patent Office, Mumbai यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करणे :**

राष्ट्रीय विज्ञान दिवस संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक २८.०२.२०२२ रोजी साजरा करण्यात आला.
सदर राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्याकरिता डॉ. मृणालिनी फडणविस, मा.कुलगुरू, पुण्यश्लोक अहील्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **Motivational Talk on Innovation & Self Reliant :**

Motivational Talk on Innovation & Self Reliant चे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक ०२.०३.२०२२ रोजी करण्यात आले.
सदर Motivational Talk on Innovation & Self Reliant च्या आयोजनाकरीता Dr.Shrinivas Chamarthy, Chief Innovation Executive & Managing Director, CYME Automation Systems Private Limited यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा करणे :**

आंतरराष्ट्रीय महिला दिवस, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक ०८ ते १२.०३.२०२२ रोजी साजरा करण्यात आला.
सदर आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा करण्याकरिता Dr. Nisha Sonare, Managing Director Special Biochem Pvt. Ltd. Amravati यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. दिनांक ०८ ते १२ मार्च, २०२२ या कालावधी दरम्यान शैक्षणिक विभागातील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी Ideathon Competition चे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **IPR कार्यशाळेचे आयोजन :**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रिसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती IPR कार्यशाळेचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रिसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती आणि श्री. शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०४.०४.२०२२ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर IPR कार्यशाळेच्या आयोजनाकरिता Dr. Suhas Kulkarni, Assistant Controller of Patents Office of Controller General of Patents, Design and Trademarks यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **जागतिक बौद्धिक संपदा दिवस :**

जागतिक बौद्धिक संपदा दिवसाचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रिसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक २६.०४.२०२२ रोजी करण्यात आले.
सदर जागतिक बौद्धिक संपदा दिवसच्या आयोजनाकरीता Mr. Ujjwal Jaypal Singh Patent and design examiner, Patent Department, Mumbai यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले

- **वार्षिक राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धा (स्टार्टअप फेस्ट २०२२ आणि व्यवसाय योजना स्पर्धा) :**

वार्षिक राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धा (स्टार्टअप फेस्ट २०२२ आणि व्यवसाय योजना स्पर्धा) चे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रीसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक ०५.०५.२०२२ आणि ०६.०५.२०२२ रोजी करण्यात आले.
सदर वार्षिक राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धा (स्टार्टअप फेस्ट २०२२ आणि व्यवसाय योजना स्पर्धा) च्या आयोजनाकरता श्री.निखिल कुळकर्णी, संचालक, इंक्युबेशन सेंटर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव Mr. Nikhil Kulkarni, Director of Incubation Centre, North Maharashtra University Jalgaon आणि Mr. Nakul Deshmukh, Managing Director iBase Technology आणि Mr. Suresh Londhe, Joint Director of Directorate of Industries यांना प्रमुख प्रवक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले असून सदर कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख प्रवक्त्यांचे मार्गदर्शन लाभले.
स्टार्टअप फेस्ट २०२२ मध्ये २०० नवउद्योजक कल्पनांनी (Startup Ideas) सहभाग नोंदविला. ह्या नवउद्योजक कल्पनांना (Startup Ideas) एक व्यासपीठ मिळवून दिले. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे व्यावसायिक योजनांचे सादरीकरण केले व उत्कृष्ट व्यावसायिक योजनांचे सादरीकरण करणाऱ्या नवउद्योजक कल्पनांना (Startup Ideas) पुरस्कार व प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. पुरस्कार व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

- **उद्योमिता यात्रा :**

उद्योमिता यात्रेचे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, रिसर्च ॲण्ड इंक्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक २१.०५.२०२२ रोजी करण्यात आले.
सदर उद्योमिता यात्रेच्या आयोजनाकरिता The teams of MSSDS along with youth aid foundation यांचा सहभाग घेण्यात आला. The teams of MSSDS along with youth aid foundation यांच्या सहभागामुळे उद्योमिता यात्रेचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य यांनी अथक परिश्रम घेतले.

****

१५) बांबू हस्तकला व कला केंद्र

बांबू हस्तकला व कला केंद्राची संकल्पना ही मा. चेन्नमनेनी विद्यासागर राव, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा कुलपती, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विचारातून प्रथम मांडण्यात आली. सदर संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणण्याचे काम हे मा.सुधीर मुनगंटीवार, मंत्री (वित्त, नियोजन व वने) महाराष्ट्र राज्य यांनी केले. त्यानुषंगाने शासनाने महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५७/फ-९, दि.१७.०५.२०१८ नुसार बांबू हस्तकला व कला केंद्र स्थापन करण्यात आले. सदर प्रकल्पास वित्तीय साहाय्य हे जिल्हा नियोजन समिती नावीण्यपूर्ण योजना या शीर्षातून, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.जीनिस/जिवायो/नापूयो/प्रामानीवि/BHAUnit/२०१८-१९/१०६४, दि.०६.०६.२०१८ अन्वये विद्यापीठास रु. ३७ लक्ष एवढा निधी मंजूर केला असून त्यापैकी रु.३० लक्ष एवढा निधी उपलब्ध करून दिला. त्यापैकी रु २९,०८,६२०/- एवढा निधी मशिनरी व तत्सम सामुग्रीवर खर्ची करण्यात आला. तथापि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात बांबू हस्तकला व कला केंद्रांची स्थापना विद्यापीठाच्या Multipurpose Hall (M.P.Hall) झाली असून दि.५.१०.२०१८ रोजी मा. चेन्नमनेनी विद्यासागर राव, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा कुलपती, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

बांबू मधील क्षमता लक्षात घेता तो बांधकाम, औषधी, उपस्कर, दागिने, कचराकुंडी इत्यादी साहित्य बनविण्यास उपयोगात येत असल्यामुंळे विद्यापीठाचे बांबू हस्तकला व कला केंद्र हे बांबू संशोधन, निर्मिती व लागवड वर काम करीत आहे. बांबू केंद्राची पुढील वाटचाल अविरत कार्यान्वित व्हावी या उद्देशाने भविष्यात खालील बाबींवर कार्य करण्याचा केंद्राचा मानस आहे.

- बांबूचे तंतू काढणे.
- बांबूपासून कागदाचा लगदा बनविणे.
- बांबूपासून औषधी काष्ठतंतू काढण्याची प्रक्रिया शोधणे.
- बांबूपासून रचनात्मक स्थापत्यकृती बनविणे व त्याची समर्थता तपासणे.
- बांबूचा अन्न म्हणून उपयोग करणे.
- नैसर्गिक व कृत्रिमरित्या बांबूचे संवर्धन करणे.
- बांबूपासून कोळसा बनविणे.
- डिझाईन स्टुडिओ तयार करणे.

प्रमाणपत्र अभ्यासक्रम :-

अ) बांबू हस्तकला प्रमाणपत्र अभ्यासक्रम

शैक्षणिक पात्रता : **१० वी पास**

कालावधी : **३ महिने**

सैद्धान्तिक : **१०० तास**

प्रात्याक्षिक : **३५० तास**

ब) बांबू हस्तकला प्रगत प्रमाणपत्र अभ्यासक्रम

शैक्षणिक पात्रता : **१० वी पास**

कालावधी : **३ महिने**

सैद्धान्तिक : **१०० तास**

प्रात्याक्षिक : **३५० तास**

***

१६) उन्नत भारत अभियान

विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ही विदर्भ तथा मराठवाडा विभागासाठी उन्नत भारत अभियान कार्यक्रमाच्या अधिक चांगल्या समन्वयाच्या उद्देशाने राष्ट्रीय समन्वय संस्था, आय. आय. टी. दिल्ली द्वारे स्थापित केलेली ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी कार्यरत असलेली प्रमुख संस्था आहे. तसेच उन्नत भारत अभियान नेटवर्कला प्रोत्साहन देणे व गावातील क्लस्टर उपक्रम राबविण्या व्यतिरिक्त सहभागी संस्थांना तयार करून पूर्वानुभवाच्या आधारे उच्च शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन आणि निरीक्षण करण्याचे कार्य करते.

विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली विविध उच्च शैक्षणिक संस्थांनी (सहभागी संस्था) राष्ट्रीय समन्वय संस्था, आय. आय. टी. दिल्ली येथे सन २०२१-२०२२ मध्ये तांत्रिक प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केले होते आणि सादर केलेल्या एकूण ०४ प्रकल्पांना राष्ट्रीय समन्वय संस्था, आय. आय. टी. दिल्ली द्वारे मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उन्नत भारत अभियानाच्या प्रभावी अमलबजावणीसाठी पंचवार्षिक एकात्मिक भविष्यकालीन योजना तयार केली आहे. त्या अनुषंगाने कार्यशाळा / वेबिनार, प्रशिक्षण कार्यक्रम, हॅड्स ऑन प्रॅक्टिसेस, इंटरॲक्शन, जागरूकता कार्यक्रम आणि विविध स्पर्धा इत्यादींद्वारे उच्च शैक्षणिक संस्था (सहभागी संस्था) व विविध भागधारकांची क्षमता निर्माण करते आणि उन्नत भारत अभियानामध्ये समाविष्ट करून घेणे हा उद्देश आहे.

विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व राष्ट्रीय समन्वय संस्था, आय. आय. टी. दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने माहे जून आणि जुलै, २०२१ मध्ये पोस्टर आणि व्हिडिओ मेकिंग स्पर्धा, कोवीड-१९ तथा लसीकरणा संबंधीत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी आयोजित केली होती. सर्व प्राप्त पोस्टर्स आणि व्हिडिओ द्वारे मूल्यमापन विभागीय समन्वय संस्थे अंतर्गत तज्ज्ञांच्या पॅनल द्वारे केले असून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी राष्ट्रीय समन्वय संस्था, आय. आय. टी. दिल्ली यांना विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ तर्फे उत्कृष्ट नोंदीची शिफारस करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राष्ट्रीय समन्वय संस्था, आय. आय. टी. दिल्ली द्वारे राष्ट्रीय स्तरावर पोस्टर आणि व्हिडिओ मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली. विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रातील सहभागी संस्था प्रोफेसर राम मेघे अभियांत्रिकी अँड मॅनेजमेंट कॉलेज, बडनेरा रेल्वे, अमरावती येथील विद्यार्थी कु. खुशबू भीमराव डोंगरे यांनी पोस्टर्स मेकिंग स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर प्रथम पारितोषिक मिळविले आहे.

उन्नत भारत अभियान मध्ये उच्च शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढवावा या उद्देशाने विभागीय समन्वय संस्था, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने देखील राष्ट्रीय स्तरावर पोस्टर्स, व्हिडिओ / शॉट फिल्म मेकिग आणि सेमिनार प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन उन्नत भारत अभियानाच्या थीमच्या अनुषंगाने आणि आझादी का अमृत महोत्सवाच्या निमित्ताने केले होते. स्पर्धेचे माहितीपत्रक २६ जानेवारी २०२२ रोजी लॉन्च करण्यात आले. या

स्पर्धे अंतर्गत एकूण ३७५ प्रवेशिका प्राप्त झाल्या. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कॅम्पस येथील वनस्पतीशास्त्र विभागामध्ये २८ मार्च २०२२ रोजी पोस्टर्स, व्हिडिओ / शॉट फिल्म मेकिंग आणि सेमिनार प्रेझेन्टेशन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आले. त्यामध्ये विजेते स्पर्धकांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्गवारीनुसार स्मृतिचिन्ह व रोख पारितोषक प्रदान करण्यात आले आणि सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

उन्नत भारत अभियान, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत विभागीय समन्वय संस्थेने केलेले उपक्रम खालीलप्रमाणे :-

- उन्नत भारत अभियान उपक्रमांच्या सुरळित कामकाजासाठी आयोजित बैठकींची संख्या : ०७
- आयोजित व्यवसाय योजना स्पर्धांची संख्या : ०८
- जून, २०२२ पर्यंत विभागीय समन्वय संस्था अंतर्गत नोंदणीकृत सहभागी संस्थाची संख्या : ८९
- विभागीय समन्वय संस्था अंतर्गत दत्तक गावांची संख्या : ४८३
- विभागीय समन्वय संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या प्रकल्पांची संख्या : ४
- विभागीय समन्वय संस्था अंतर्गत कोविड-१९ (साथीच रोग) संकटाच्या दरम्यान जनजागृती केलेले उपक्रमांची संख्या : ०१

उन्नत भारत अभियान, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत भाग घेणाऱ्यो संस्थेने केलेले उपक्रम खालीलप्रमाणे :-

- विभागीय समन्वय संस्थे अंतर्गत दत्तक घेतलेल्या गावांची संख्या : ३४
- गांव सर्वेक्षण पूर्ण : ०४
- पूर्ण झालेल्या घरगुती सर्वेक्षणांची संख्या : २८२

***

प्रकरण सातवे
आर्थिक बाबी

१) आगम - शोधन

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये विद्यापीठास एकूण निव्वळ आगम रुपये ७६६४८९१९५.१६/- इतके असून निव्वळ शोधन रुपये ७४११०९३३६.२७/- इतके आहेत. उपरोक्त निव्वळ शोधनाच्या रकमेमध्ये परीक्षा संचालन, इमारत बांधकाम तसेच इतर कामाकरिता दिलेल्या अग्रिमाचा समावेश करण्यात आलेला नाही.

१. राज्य शासनाकडून वेतन अनुदानापोटी २०२०-२१ या आर्थिक वर्षात रुपये ४३६८६७०७६.००/- इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. प्राप्त अनुदान आणि मागील वर्षातील शिल्लक असलेल्या अनुदानातून मान्यता प्राप्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी रुपये २९२२८१८५१.००/- इतका खर्च झालेला असून शिक्षकाच्या वेतनापोटी रुपये १६००८२२३०.००/- इतका खर्च झालेला आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अहवाल काळात वेतन अनुदान प्राप्त झालेले नाही.

३. विद्यापीठाचे प्रमुख आर्थिक स्त्रोत हे विद्यार्थ्यांपासून प्राप्त होणारे परीक्षा शुल्क होय. २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये रुपये २०९२३०१२४.७६/- इतके परीक्षा शुल्क प्राप्त झालेले असून परीक्षेव्यतिरिक्त इतर बाबींपासून प्राप्त झालेले उत्पन्न रुपये ११५३६२३७४.५०/- इतके आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्क रुपये ४५४७९४५५.००/-, महाविद्यालयांकडून प्राप्त शुल्क रुपये ८९९८००५.००/- विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांकडून प्राप्त शुल्क रुपये २००३३१७४.५०/- शा.शिक्षण व रंजन शुल्क रुपये १५२६२६९०.००/- ठेवींवरील व्याज रुपये ११०२६४४४.००/-, केंद्रीय प्रवेशापासून प्राप्त शुल्क रुपये ५३०२४५९.००/- आणि इतर किरकोळ उत्पन्न रुपये ९२६०१४७.५०/- चा समावेश आहे. परीक्षा खर्च रुपये ५०७५८४७८.००/- इतका असून आकस्मिक व्यय रुपये १२१८६२३०९.५६/- इतका आहे. ज्यामध्ये छपाई, लेखन सामुग्री, डाक व तार खर्च, ईमारतींची दुरुस्ती व देखभाल, उद्यानातील मजुरांना मजुरी, महानगरपालिकेचा कर, विद्युत व्यय, वाहनांची दुरुस्ती व देखभाल, विद्यापीठाच्या विविध प्राधीकारिणी/ कर्मचारी/अधिकाऱ्यांचा प्रवास खर्च, वृत्तपत्रे-नियतकालिके, दैनिक कामगारांची मजुरी, पदवीदान समारंभ, बगिच्यांची देखभाल इत्यादी समावेश आहे. याशिवाय घसारा निधी रुपये ५८५२१५६७.००/-, निकाय निधी रुपये २०७४६५९.००/- आणि पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचा खर्च रुपये २२५४८५१५.००/- आहे.

४. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाव्यतिरिक्त साधारण निधीमधून प्रशासकीय विभाग व शैक्षणिक विभागाचे उपस्कर, उपकरणे, इ. करिता रुपये ३०२२००७३.००/-, इमारत व भांडवली खर्च रुपये १३८४०५२२.००/- आणि पुस्तकांकरिता रुपये ३३१०२३४.००/- इतका खर्च झालेला आहे.

५. राज्य शासनाकडून इमारत बांधकाम व परिसर विकासाकरिता २०२१-२२ या आर्थिक वर्षात अनुदान प्राप्त झाले नाही.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून २०२१-२२ या आर्थिक वर्षात इमारत बांधकामाकरिता अनुदान प्राप्त झाले नाही. तसेच पुस्तकांकरिता अनुदान प्राप्त झाले नार्ही .

७. केंद्र शासनाकडून २०२१-२२ संशोधन प्रकल्पाकरिता रुपये १०३२२३७.००/- इतके अनुदान प्राप्त झाले. पूर्वीच्या शिल्लक अनुदानातून रुपये २६०४२७६.००/- इतका खर्च झाला.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राज्य शासनाकडून तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून खालीलप्रमाणे वेतन व वेतनेतर अनुदान प्राप्त झालेले आहे.

१) वेतन अनुदान

अ) राज्य शासन

वेतन अनुदान : रुपये ४३६८६७०७६.००/-

डॉ.श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र : रुपये निरंक

ब) विद्यापीठ अनुदान आयोग : रुपये निरंक

२) वेतनेतर अनुदान

अ) राज्य शासनाकडून इमारत बांधकाम व परिसर विकासाकरिता अनुदान : रुपये निरंक

ब) राज्य शासनाकडून प्रशासकीय विभाग तथा पदव्युत्तर विभागाकरिता अनुदान : रुपये निरंक

क) संशोधन प्रकल्प (राज्य शासन) : रुपये ७८५५१२८.००/-

ड) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदान : रुपये निरंक

३) केंद्र शासनाकडून अनुदान रुपये १०३२२३७.००/-

अ.क्र.	तपशील	२०२०-२१(रुपये)	२०२१-२२(रुपये)
	'अ' आवर्ती		
१)	**राज्य शासन अनुदान**		
अ)	वेतन अनुदान	४४२१७९१९४.००/-	४३६८६७०७६.००/-
	मॉडेल डिग्री कॉलेज	निरंक	निरंक
	श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र	निरंक	निरंक
ब)	वेतनेतर अनुदान(मॉडेल डिग्री कॉलेज)	निरंक	निरंक
क)	अनुदानित विभागाकडून प्राप्त शिक्षण शुल्क	निरंक	निरंक
ड)	राष्ट्रीय विज्ञान दिवस	१००००.००/-	१००००.००/-
इ)	राष्ट्रीय विज्ञान दिवस	निरंक	निरंक
२)	**केंद्र व इतर संस्थांकडून अनुदान**		
	१) विद्यापीठ अनुदान आयोग		
अ)	वेतन अनुदान	निरंक	निरंक
ब)	वेतनेतर अनुदान	निरंक	निरंक
	२) केंद्रशासन	निरंक	निरंक
३)	**परीरक्षण**		
अ)	परीक्षा शुल्क	११८६४६५२८.३६/-	२०९२३०१२४.७६/-
ब)	शिक्षण शुल्क व इतर	७९३९६१६९/-	२००३३१७४.५०/-
क)	संकीर्ण	७३२४२२४.००/-	९२६०१४७.५०/-
४)	**दाननिधी**	निरंक	निरंक
	'अ' आगम	**६५४०४५३४९.३६/-**	**६७५३९०५२२.७६/-**

अ.क्र.	तपशील	२०१९-२०(रुपये)	२०२०-२१(रुपये)
	'ब' अनावर्ती		
	१) राज्य शासनाकडून अनुदान		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत	निरंक	निरंक
	२) विद्यापीठ अनुदान आयोग		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत	निरंक	निरंक
	३) केंद्र शासनाकडून अनुदान (भांडवली व उपकरणे)	निरंक	निरंक
	पुस्तके	निरंक	निरंक
	'ब' आगम	निरंक	निरंक
	एकूण (अ + ब)	**६५४०४५३४९.३६/**	**६७५३९०५२२.७६/-**

अ.क्र.	तपशील (शोधन)		२०२०-२१(रुपये)	२०२१-२२(रुपये)
	'अ' आवर्ती			
१)	**आस्थापनेवरील खर्च**	**अ) शिक्षक कर्मचारी**		
		१) राज्य शासन	१५५०९६०६२.००/-	१६००८२२३०.००/-
		२) विद्यापीठ अनुदान आयोग	निरंक	निरंक
		३) मॉडेल डिग्री कॉलेज	३६६०५१५.००/-	२४४७६६१.००/-
		४) डॉ. श्रीकांत जिचकार मेमो. रिसर्च सेंटर	निरंक	निरंक
		ब) शिक्षकेतर कर्मचारी		
		१) राज्य शासन	२८४६१२८४२.००/-	२६०४२७६.००/-
		२) विद्यापीठ अनुदान आयोग	निरंक	निरंक
		३) केंद्र शासन	निरंक	निरंक
		४) मॉडेल डिग्री कॉलेज	८४५२४१.००/-	२६९८२२४.००/-
		५) साधारण निधी	४२५२५६५.००/-	१४५५२००.००/-
		६) डॉ. श्रीकांत जिचकार मेमो. रिसर्च सेंटर	११४७२९.००/-	७२०००.००/-
		क) राष्ट्रीय विज्ञान दिवस	१००००.००/-	१००००.००/-
		ड) राष्ट्रीय गणित दिवस	५०००.००/-	५०००.००/-
		इ) **राज्य शासन आवर्ती खर्च**	निरंक	निरंक

२)	आकस्मिक व्यय	९८६२४८३१.५९	१२१८६२३०९.५६
३)	परीक्षण व्यय	निरंक	निरंक
४)	परीक्षा व्यय	१९६९९२३९३	५०७५८४७८
५)	मुद्रण व्यय	३४७६७२३	२३८३५८५.००
६)	संकिर्ण व्यय	५०१४०२२७.८०	५५९८५९४१.३१
७)	घसारा निधी	४११७८४२४	५८५२१५६७.००
८)	विद्यापीठ अनुदान आयोग	निरंक	निरंक
९)	दाननिधी	निरंक	निरंक
१०)	केंद्रशासन	१३८१७९२	१०३२२३७.००
	'अ' शोधन	**८४०५२६८९०.५९**	**४०९५१६३६१.३१**

अ.क्र.	**तपशील (शोधन)**	**२०२०-२१**	**२०२१-२२**
	'ब' अनावर्ती		
१)	साधारण निधी		
	अ) पुस्तके	२८८०१७२.००	३३१०२३४.००
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	३६६२९३.००	१३७६७०५८.००
	क) भांडवली व इमारत खर्च	१०७७२७८३.००	१३८४०५२२.००
२)	**राज्य शासन अनुदान**		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत खर्च	१०७७२७८३.००	१३८४०५२२.००
३)	**विद्यापीठ अनुदान आयोग**		
	अ) पुस्तके	निरंक	निरंक
	ब) उपस्कर,उपकरणे,साहित्य	निरंक	निरंक
	क) भांडवली व इमारत खर्च	निरंक	निरंक
४)	**केंद्रशासन अनुदान**		
	अ) भांडवली व इमारत खर्च	निरंक	निरंक
	ब) संशोधन प्रकल्प	१३८१७९२.००	१०३२२३७.००
	क) पुस्तके	निरंक	निरंक
	'ब' शोधन	२६१७३८२३.००	४५७९०७३.००
	एकूण (अ + ब)	**८६६७००७१३.५९**	**४५५३०६९३४.३१**

।।।।।।

२) शिष्यवृत्ती

अ) सन २०१९ - २०२० व २०२० - २०२१ या शैक्षणिक सत्रातील कै.श्री शंकरराव गोविंद जोग व कै.श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती.

सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. ३२/२००७ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

(१) 3. iv) a) प्रमाणे प्रथम वर्ष भाग-१ ला पदार्थ विज्ञान हा विषय घेऊन प्रवेशित झालेल्या व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये (उन्हाळी)पदार्थ विज्ञान या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास रु. ५००/- शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

b) व c) प्रमाणे अनुक्रमे विज्ञान स्नातक भाग-१ व विज्ञान स्नातक भाग-२ च्या उन्हाळी परीक्षेत पदार्थ विज्ञान विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या आणि अनुक्रमे भाग-२ व भाग-३ ला प्रवेशित घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ५००/- शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

१. खालील नमूद विद्यार्थी सत्र २०१९-२० च्या शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नांव व महाविद्यालयाचे नांव	प्रवेशित वर्ग	शिष्यवृत्तीची रक्कम
१.	कु. मानसी राजेश बच्छा ब्रिजलाल बियानी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	विज्ञान स्नातक भाग-१ (प्रथम सत्र)	५००/-
२.	कु. अश्विनी गजानन हागे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट, जि. अकोला.	विज्ञान स्नातक भाग-२ (तृतीय सत्र)	५००/-
३.	कु. अंजली व्यंकटराव दहिवेले श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	विज्ञान स्नातक भाग-३ (पाचवे सत्र)	५००/-

२. खालील नमुद विद्यार्थी सत्र २०२०-२१ च्या शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नांव व महाविद्यालयाचे नांव	प्रवेशित वर्ग	शिष्यवृत्तीची रक्कम
१.	कु. श्रृती पुरुषोत्तम पकडे श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	विज्ञान स्नातक भाग-१ (प्रथम सत्र)	५००/-
२.	कु. फुरकान अहमा खान मुजफ्फुल्लाहखान मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ	विज्ञान स्नातक भाग-२ (तृतीय सत्र)	५००/-
३.	कु. वैष्णवी किशोरराव किडे, स्वातंत्र्य सैनिक श्री. कन्हैय्यालाल रामचंद्र महाविद्यालय, कारंजा लाड	विज्ञान स्नातक भाग-३ (पाचवे सत्र)	५००/-

ब) सन २०१८-१९ या शैक्षणिक सत्रातील स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती.

सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. ३३/२००७ व ६/२०१५ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

१. सन २०१८-२०१९ या शैक्षणिक सत्रात प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग एण्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वे, अमरावती येथे अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रीकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या कु. स्नेहल प्रशांत डाहाके या विद्यार्थिनीने अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रीकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात एकत्रितरित्या सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल ती सन २०१८-२०१९ शैक्षणिक सत्राच्या रु. २,०००/- च्या स्व.दिलीप बी.शिंगोरे शिष्यवृत्तीची मानकरी ठरलेली आहे.

क) सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रातील स्व. मुकुंद नरहरी काळे स्मृती संशोधन शिष्यवृत्ती.
सदर शिष्यवृत्ती विनियम क्र. २/२०१० व सुधारणा विनियम क्र. ८/२०१७ प्रमाणे प्रदान करण्यात येते.

शैक्षणिक सत्र २०२०-२०२१ व २०२१-२०२२ करिता विद्यार्थी पात्र नाहीत.

निरंक

ड) सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रातील वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती
विनियम क्र. ३१/१९९८ प्रमाणे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या कला स्नातक परीक्षेत इतिहास या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम प्रयत्नात व कमीतकमी वेळेत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात वाङमय पारंगत भाग-१ ला इतिहास हा विषय घेऊन प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यास सदर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

